<u>दिनांक: ११.०८.२०२५.</u>

<u>नियमित फौ.ख.क्र. ४५/२०२४</u>
<u>सरकार ..वि.. चंद्रवदन खोब्रागडे</u>
<u>निशाणी क्रमांक — १७</u>

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक २ यांची जबानी</u> –**
<u>मी शपथेवर सांगतो की,</u>

| | | |
|---|---|---|
| **<u>नाव</u>** | : | **नरेश रामकृष्ण प्रभे,** (घटनास्थळ पंच) |
| **<u>वय</u>** | : | ४२ वर्षे, |
| **<u>व्यवसाय</u>** | : | मजुरी, |
| **<u>राहणार</u>** | : | वार्ड क्रमांक १, शिरजगाव मोझरी, ता.तिवसा, जि. अमरावती. |

..........................................................................................................................

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील कु. एल. टी. गेडाम यांचेमार्फत शपथेवर सुरु</u> –**

मी आरोपीला व फिर्यादीला ओळखतो. घटनेबददल मला काहीही माहीत नाही. पोलीसांनी माझ्यासमक्ष कोणताही घटनास्थळ पंचनामा तयार केला नव्हता. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहित नाही.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे विद्वान सहाय्यक सरकारी वकीलांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली असता भारतीय पुरावा कायदयाच्या कलम १५४ नुसार परवानगी देण्यात येत आहे.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २९.०२.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजताच्या दरम्यान मला मोटरसायकलचे काम असल्यामुळे मी योगेश जंवजाळकर याची मोटरसायकल घेऊन गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, योगेश जंवजाळकर यांची मोटरसायकल परत करण्याकरीता मी रवि हगवणे यांच्या घरी आलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपी व फिर्यादी यांचा वाद सुरु होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा फिर्यादीला शिविगाळ करीत होता व त्यांच्यामध्ये झोबाझोंबी सुरु होती. हे म्हणणे खरे

नाही की, त्यावेळी आरोपीच्या हातातील कडे फिर्यादीच्या तोंडावर व नाकावर लागल्यामुळे फिर्यादीच्या नाकातुन रक्त निघाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी आरोपी व फिर्यादीमधील वाद सोडविला होतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी दिनांक ०२.०३.२०२४ रोजी दिनेश हगवणे याच्या घरासमोर घटनास्थळ पंचनामा करण्याकरीता बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्यासोबत दुसरा पंच रवि हगवणे हा होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ हे फिर्यादीने मला दाखविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविण्याकरीता न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. जी. व्ही. तंवर यांचे मार्फत – नाकारला.**

**फेरतपास काही नाही.**

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.** **समक्ष,**

स्वा/-
**(रोहिणी वि. मनोरे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**तिवसा.**

स्वा/-
**(रोहिणी वि. मनोरे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**तिवसा.**